**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**
Maharashtra, India
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

जा.क्र. :- कबचौउमवी /डॉ.बा.आं.स्प.प.मा.कें / ४०/ २०२४ दि. २२ /०३ /२०२४

## दरमागणीपत्रक

प्रति,

------------------

------------------

------------------

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र येथे खालील तक्त्यात नमूद विविध वस्तूंच्या खरेदीसाठी सीलबंद दरपत्रकेसादर करण्यास इच्छुक असलेल्या पुरवठादारांकडून दरपत्रक मागवण्यात येत आहेत.

| अ.क्र. | साहित्याचा तपशील | तांत्रिक स्पेसीफीकेशन्स अत्यावश्यक | तांत्रिक स्पेसीफीकेशन्स अतिरिक्त | संख्या | दर (सर्व करांसह) | एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | 3 | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | Projector Screen | Wall Mount Motorised Screen, Screen Size 100 inch with Remote Control | --- | ०१ | रु. ११,०००/- पर्यन्त | ११,०००=०० |

(दरपत्रक सादर करताना रकाना क्र. ३ वरील अत्यावश्यक तांत्रिक स्पेसीफीकेशन्स हेच तुलनात्मक दरांसाठी ग्राह्य धरले जातील.)

दरपत्रके सादर करण्यासाठी आवश्यक असलेल्या अटी व शर्ती –

१. खरेदीची अंदाजित रक्कम रु. ११,०००/- इतकी आहे.

२. विद्यापीठात खरेदी करावयाचे साहित्य हे विद्यापीठात प्रत्यक्ष पोहोच करून, फिटिंग करून द्यावयाचे आहे.

३. दर सादर करताना भाडे,पॅकिंग, फिटिंग तसेच इतर प्रासंगिक खर्च विचारात घेऊन दर सादर करावेत.एकापेक्षा जास्त मेक आणि मोडेल साठी किमती द्यावयाच्या असल्यास वेगवेगळया द्याव्यात. तसेच Warrantee/Guarantee नमूद करून त्याचे कार्ड मालाच्या पुरवठासोबत जोडणे आवश्यक आहे.

४. आवश्यकता भासल्यास पुरवठादारांना प्रत्यक्ष जागेची/विद्यापीठात उपलब्ध नमुन्याची पाहणी करता येईल.आवश्यक असेल तेथे पडताळणीसाठी नमुना (sample)जोडावा लागेल.

५. दरपत्रकात मागणी केलेल्या साहित्यातील संख्या कमी/अधिक करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

६. दरमागणीपत्रातील तपशीलात बदल करण्याचा, रद्द करण्याचा, दुरुस्ती करण्याचा, तसेच आलेले दरपत्रक नाकारण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

७. अग्रीम स्वरुपात कुठलीही रक्कम मिळणार नाही. तसेच सशर्त दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.

८. पुरवठादाराने पॅनकार्ड, उद्यम/शॉप ॲक्टनोंदणीपत्र तसेच GST प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. GSTमध्ये नोंदणी नसल्यास, त्याचे कारणासहित घोषणापत्र (Declaration) द्यावे.

९. देयके सादर करताना विद्यापीठाचाGSTNo. 27AAAJN0465A1ZLचा उल्लेख करून पक्के बिल द्यावे लागेल. GSTशासकीय खात्यात भरणा करीत असल्याचा पुरावा म्हणून मागील महिन्याचा GSTR-3B सोबत जोडावा. त्यातील नियमितता पाहूनच बिलाची अदायगी करण्यात येईल किंवा GST ची रक्कम राखून उर्वरित देयकाची अदायगी करण्यात येईल.GSTची रक्कम 2Aपडताळणी केल्यानंतर अदा करण्यात येईल.

१०. साहित्याच्या/सेवेच्या गुणवत्तेमध्ये फरक आढळल्यास बिलाची अदायगी करण्यात येणार नाही.

११. खरेदी आदेश/कार्यादेश दिल्यानंतर पुरवठादाराने वस्तू/सेवेचा विहित कालावधीत पुरवठा केला नाही, तर सदर वस्तू/सेवा द्वितीय क्रमांकाने किमान दर सादर करणाऱ्या पुरवठादारांनकडून खरेदी करण्यात येईल. अश्या परिस्थितीत विद्यापीठाला आर्थिक नुकसान सहन करावे लागल्यास त्याची नुकसान भरपाई आपणाकडून करून घेण्यात येईल. तसेच आपल्या आस्थापनेचे नाव पुरवठादारांच्या काळ्या यादीत टाकण्यात येईल.

१२. संबंधित विभागाकडून वस्तू/सेवा समाधानकारक मिळाल्याचा अहवाल वित्त विभागात सादर झाल्यानंतर ७ दिवसाच्या आत बिल अदायगी करण्यात येईल. आवश्यक असेल तेथे शासकीय करकपात करण्यात येतील.

**१३.** सदरचे सीलबंद दरपत्रक हे पुरवठादाराच्या लेटरहेडवर सही व शिक्क्यानिशी सर्व करांसह दर नमूद करून **मा. संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.** यांचे नावे **डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या** कार्यालयात **दि. २८ /०३ /२०२४ रोजी किंवा तत्पूर्वी कार्यालयीन वेळेत सादर करावे.**

१४. दर मागणी पत्रकात काही बदल झाल्यास अथवा वेळेत वाढ दिल्यास त्याची सूचना ही शुद्धिपत्रक म्हणून विद्यापीठाचे पोर्टल www.nmu.ac.in वर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

१५. प्राप्त दरपत्रकांतून केवळ किमान दर नमूद केलेल्या पुरवठादाराशीच संपर्क करण्यात येईल. त्यामुळे दर नमूद करताना अवास्तव दर नमूद करू नयेत.

१६. दरपत्रकासंदर्भात अतिरिक्त माहितीसाठी श्री/श्रीमती. डॉ.अजय उत्तमराव सुरवाडे मो.नं. ९४२०६७५६०२ ऑफिस नं ०२५७-२२५७४११ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

१७. पुरवठादाराने सदरचा नमुना आपल्या सही शिक्क्यानिशी आपण सादर करीत असणाऱ्या दरपत्रकासोबत उपरोक्त अटी व शर्ती मान्य आहेत या करिता जोडून पाठवणे आवश्यक आहे.

22/03/2024

संचालक

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.**

मला / आम्हाला उपरोक्त अटी व शर्ती मान्य आहेत.

पुरवठादाराची सही व शिक्का

मो. नं.